# प्रकरण चौथे

# 'गावाकडच्या गोष्टी' मधील व्यक्तिरेखा आणि त्यांची भाषाशैली

## प्रास्ताविकः

व्यंकटेश माडगूळकर हे मराठी साहित्यविश्वाला एक नवकथाकार म्हणून सर्वज्ञात आहेत. त्यांचा माणदेशी जीवनाला प्रभावीपणे रेखाटणारा कथासंग्रह म्हणून 'गावाकडच्या गोष्टी' या कथासंग्रहाचा उल्लेख केला जातो. या कथासंग्रहात माडगूळकरांनी माणदेशी माणसांचे बारकावे नाल्या नेवरा, बजा वाणीण, गणा चलपते, आबानाना, सोन्यासाळी, गोपा व्हरल, बाबू म्हातारे या व्यक्तींच्या माध्यमातून टिपले आहेत.

तसेच या व यासारख्या अनेक व्यक्तिरेखा या कथा संग्रहातून माणदेशी माणसाचे जीवनसंस्कृती, चालीरीती, रुढी परंपरा, श्रध्दा-अंधश्रध्दा, घेऊन येतात माडगूळकरांच्या पात्रांविषयी बोलत असताना सुधा जोशी म्हणतात, ''माडगूळकरांच्या कथाविश्वात पात्र हा घटक विशेष प्रभावी आहे असे दिसून येते. आपल्या समाजातील विविध स्तरातील जाती-जमातीतील, व्यवसायातील आणि विविध वयोगटातील व्यक्तींनी त्यांची पात्रसृष्टी घडलेली आहे. स्वभाव विशेष व्यक्तिमत्त्व, जीवनसरणी, सुख-दुःखे, इत्यादी बाबतीत त्यांच्यातील वैचित्र्यदेखील लक्षणीय आहे. पात्रांचा आणि समाजजीवनाचा एवढा पैस सामावून घेणारी कथासृष्टी मराठी साहित्यात सहज अढळणार नाही''.[१]

प्रस्तुत प्रकरणात 'गावाकडच्या गोष्टी'मधील व्यक्तिरेखांचा अभ्यास आणि त्यांच्या भाषाशैलीचा विचार करणे अभिप्रेत आहे.

**नाल्या नेवराः**

आई आणि बायकोच्या चैनिखोरवृत्तीमुळे परिस्थितीसमोर हतबल झालेली 'बोजा' या कथेतील व्यक्तिरेखा म्हणजे नाल्या नेवरा होय. असा हा पापभिरु स्वभावाचा नेवरा वृत्तीने गरीब, शांत स्वभावाचा आहे. आर्थिक बाजूने डबघाईला आलेला नेवरा अंगात मळका शर्ट, आखूड धोतर आणि डोक्यावर पांढरी टोपी घालून रस्त्याने चालू लागला म्हणजे डाव्या पायावर अधिक भार टाकतो. त्यामुळेच त्याचे शरीर मोहरमच्या 'नालसाब' सारखे झोले घेताना दिसते. म्हणूनच नेवराला गावातील लोक नाल्या नेवरा म्हणून संबोधताना दिसतात. अशा या पापभिरू नेवराच्या स्वभावाचा फायदा त्याची आई व बायको घेताना दिसते. आई आपला पैसा शिल्लक ठेवून मुलाच्या पैशावर सुख घेणारी तर बायको दागदागिण्याची हौस उधारीवर पुरवणारी आहे. नेवराचा स्वभाव मवाळ तर बायको फटाकडी, अशा या बायकोपासून तो थोडा दचकूनच असतो. कारण अशा बाईवर हात टाकला तर तीही हात वर करायला भिणारी नाही असे त्याला वाटते. शेतीवाडी असतानाही नेवरासारख्या माणसांना कर्ज व्हावे याचे खरे कारण म्हणजे त्याचा भोळसट स्वभावच कारणीभूत आहे असे दिसते. तो आईच्या आणि बायकोच्या हट्टाला खतपाणी घालताना दिसतो. कारण गणा चलपत्याला तो "म्हातारी मालासाठी पैसा घेती. बायकोची रहाणी बामणावाणी खर्चाची"(पृ.२३) असे म्हणताना दिसतो. यावरून तो त्यांच्या हट्टास खतपाणी घालतो हे दिसते.

नवरा हा कर्जाच्या बोजामुळे आणि बायकोच्या वर्तनामुळे गावात न वावरता शेतातच दिसून येतो. त्याच्या मनस्थितीविषयी बोलताना तो गणाला "कूनापाशी बोलत न्हाई, बग, मनालाच खातू अन् गप बसतू."(पृ.२३) असे म्हणतो. यावरून त्याची मनस्थिती स्थिर नाही. त्याला चारही बाजूंनी वेढले आहे, हे दिसते.

नेवरा गणाच्या बोलण्याला बळी पडून शेतीची करार पावती करून घरी येताच आई दोरी गळयात लटकवलेली तर बायको वटवंटयावर डोके आपटून घेत असलेली बघताच त्याला यमयातना होताना दिसतात. म्हणूनच तो गणाच्या घरी जाऊन 'गणा माजी जमीन द्यायची नाही!" (पृ.२८) असे म्हणताना दिसतो. यावरून त्यांचे आई व बायकोवरील प्रेम व्यक्त होते. म्हणूनच नेवरासारख्या व्यक्तीरेखांविषयी गंगाधर गाडगीळ म्हणतात, "माडगूळकरांची पात्रे निर्व्याज आहेत तशीच निष्पाप देखील आहेत. असेही म्हणता येईल की ती निर्व्याज आहेत म्हणूनच निष्पाप आहेत."[२]

## गणा चलपतेः

बोजा या कथेतील एक धूर्त अशी व्यक्तिरेखा म्हणजे गणा चलपते होय. गणाने आपल्या आयुष्यातले बरेच दिवस शहरात घालवलेला आहेत. त्याचे केस इंग्रजी पध्दतीने कापलेले असून त्याच्या बोलण्यातही अधूनमधून इंग्रजी शब्द येताना दिसतात. म्हणूनच त्याच्या घरी रेडिओ, ग्रामोफोन, हातातील सेलची बॅटरी असल्या अधुनिक वस्तू दिसून येतात. त्यामुळेच गावातील लोक गणाला एक बडी असामी म्हणून ओळखता दिसतात.

असा हा गणा चलपते धूर्त आहे. विडी ओढणा-या नेवराला तो शिगारेट देऊन आपला हेतू साध्य करण्याचा प्रयत्न करतो. त्याला नेवराच्या आर्थिक परीस्थितीची माहिती असतानाही तो त्याला ''तुला परपंच्याची काळजी का? बळकळ कुणबाबा हाय'' असा खोचक प्रश्न विचारतो तर नेवरा ''लई वडावड चाललीया माजी!'' (पृ.२३) म्हणताच त्याला विश्वासात घेवून शेत विकण्याचा सल्ला देतो. गावात आपल्याशिवाय कोण शेत घेणार नाही याची त्याला खात्री असते. पण तो शेत घेणार नाही याचा आव आणताना दिसतो. यावरून त्याचा मुत्सदी स्वभाव प्रकट होतो. नेवरा शेताचा केलेला करार रद्द करण्यासाठी गेला असता गणा शंभर रूपयाच्या कराराला पाचशे रूपये घेतो यावरून त्याची लोभी वृत्तीही दिसते.

**बजा वाणीणः**

एक कजाग सासू म्हणता येईल अशी बोजा या कथेतील व्यक्तिरेखा म्हणजे बजा वाणीण होय. ती जातीने कुणबी पण वाण्याचा व्यवसाय करणारीही म्हातारी भाल्यासारखी उंची व विळयासारखी वाकली आहे. अशी असूनही ती अजूनही धडपडते. तिने आपल्याच घरात एक किराणा दुकान काढले आहे. ती माळकरी असून ही रूपयामागे आठ आणे कमवते. हिचा स्वभाव म्हणजे आपले ठेवू आणि दुस-याचे खाऊ असा आहे. कारण ही आपले पैसे ठेवते त मुलाच्या पैशाचा दुकानातील माल भरते. वयाने झाली असली तरी उंची कपडे फाडणे आणि गोड-धोड खाणे तिला आवडते.

बजा वाणीण ही कपटी स्वभावाची स्त्री आहे. तिच्या आणि सुनेच्या आड विस्तू ही जात नव्हता. सूनेने हात उचल्यानंतर तिने

बॉंब मारून गाव गोळा केले. पण गावाने लक्ष न दिल्यामुळे ती सुनेला देव घालणे, कर्णी करणे असले प्रकार करते. तशी ती स्वार्थी ही आहे. मुलाने कर्जापोटी जमीन विकताना ती अंगात आल्यासारखी घूमू लागते व त्याला 'अरं, मरं की रं मरं! आंघुळी करून मोकळी हुईन!' (पृ.२७) असे म्हणते. यावरून तिला आपल्या मुलाच्या जीवापेक्षा जमीन अधिक महत्त्वाची वाटते. तिने मुलाच्या स्वभवाचा पुरेपर फायदा उठवलेला दिसतो. मुलाला धाकात ठेवल्यामुळेच ती फास लावल्याचे सोंग करून शेताची करार पावती रद्द करण्यास भाग पाडते. अशी ही बजा वाणीण संपूर्ण घर ताब्यात ठेवताना दिसते.

## नाल्या नेवराची बायको:

एक नटवी स्त्री म्हणता येईल अशी 'बोजा' या कथेतील व्यक्तिरेखा म्हणजे नेवराची बायको होय, ती अंगावर चांगले चांगले दागिने घालते. दात दातवणाने काळे करून मुलाला आफू घालून गावकर फिरताना दिसते.

या बाईचा स्वभाव खाष्ट आहे. म्हणूनच तिचा नवरा ही तिच्यापासून दोन हात लांब राहताना दिसतो. कधी भांडताना तिच्यावर हात टाकलाच तर ती सहन करून घेईलच असे नाही. याचा अनुभव तिच्या सासूने घेतलेला दिसतो. सासूने अंगावर हात टाकताच ती "याद धर थेरडे, पुन्हा माझं नाव काढशील तर पाय मोडून टाकीन"(पृ.२२) अशी धमकी देते. अशा या स्त्रीवर करणी, विषबाधा असल्या गोष्टीचा फरक पडत नाही. ही बाई जातीने कुणबी पण तिचे राहणीमान ब्राम्हाणासारखे. आपल्या चैनीमुळे आपल्या नव-याला कर्ज झाले याची काळजी न करता ती उधारी

करून दागिण्याची हौस पुरवते यातूनच ती संसारापेक्षा नटण्याला महत्त्व देते. कर्ज झाले म्हणून नवरा शेती विकण्याची विचार करताच ती ''नवरा न्हवंस तू. वैरी हायेस माजा''(पृ.२७) असे म्हणताना दिसते. अशी ही स्त्री संसारापेक्षाही नटण्याला महत्त्व देते.

**सोन्या साळीः**

इर्षेला पडून स्वतःच्या संसाराची विल्हेवाट लावून घेणारी व्यक्तिरेखा म्हणजे सोन्या साळी होय. शहरात राहून आलेला चैनीखोर वृत्तीचा सोन्या आपल्या आयुष्याची कमाई मटनमूर्गीत खर्च केलेला आहे. तो डोक्यावर जरीकाठी फेटा, अंगात चांदीच्या बटणांचा शर्ट, हातात घडयाळ आणि पायात काळे बूट घालून गाय विकून घेतलेल्या सायकलीवरून फिरताना दिसतो.

इतरांशी ईर्षा करणे हा सोन्या साळयाचा गुणच आहे. गांधीवधाच्या दंगलीत जळालेली घरे ब्राम्हण लोक पुन्हा उभा करताना सोन्या आपले घर न्याहाळीत बायकोला ''केरे बामणांनी वाडं धरलं. आपण माडी बांधूया दोन मजली''(पृ.३१) असे इर्षेने म्हणताना दिसतो. चैनी करणे हे सोन्याच्या अंगात भिनलेले दिसते. त्याने बाहेरगावी जे काही मिळवले ते संपूर्ण घालवून शेवटी शेती विकून चैनी करताना दिसतो. त्याला जो ओळखीचा भेटतो त्याला तो सिगारेट देताना दिसतो. समोरची व्यक्ती नकार देताच ''आरं, ओढ, जोपतूर हा सोन्या आहे, तोपतूर शिगारेटशिवाय ओढू नकोस''(पृ.३१) असे चैनीच्या झोकात बोलताना दिसतो. चैनी बरोबरच तो रंगेलही आहे. गावच्या बाजारा दिवशी तो हॉटेलवाल्या बाई बरोबर लगट करताना दिसतो आणि लगट बघून गावच्या लोकात चाललेली खुजबूज

ऐकताच त्याला विलक्षण आनंद होतो. यातून त्याचा रंगेल स्वभाव प्रकट होतो.

तसा सोन्या साळी जिद्दी आहे. आपली जमीन आणि बायकोचे दागिने विकून तालूक्याच्या कारागिरांना दुप्पट रक्कम दऊन आपली माडी बांधण्याची हौस पूर्ण करून माडीवरून संपूर्ण गाव न्याहाळतो. आपली इच्छा पूर्ण झाल्यावर काही दिवसातच तो 'माडी विकणे' असा बोर्ड लावतो. गावातील लोक माडी विकण्याचे कारण विचारताच "हौसेल मोल न्हाई."(पृ.३४) असे म्हणताना दिसतो. यातून त्याची जिद्दी आणि ढोंगी वृत्ती दिसून येते. असा हा सोन्या इर्षेसाठी संपूर्ण संसार धूळीस मिळवतो.

## बाबू म्हातरेः

'दोरी जळाली पण पिळ गेला नाही' अशी व्यक्तिरेखा म्हणजे बाबू म्हातरे होय. तो वयाने झाला आहे पण त्याच्यातील मग्रुरी गेली नाही. वयाने थकलेला असला तरी अंगापिंडाने बैलासारखा आहे. त्याचे खांदे रूंद, डोळे शरीराच्या मानाने लहान, वरून शाळा मास्तरांसारखा दिसणारा बाबू एकदा का बिघडला तर संपूर्ण गावात मारकी म्हणून प्रसिध्द असणारी त्याची बैलंही मालकाच्या रागीट बोलणे ऐकताच थरथर कापत आणि भीतीने तोंड वासत.

असा हा वयाने झालेला रागीट स्वभावाचा बाबू म्हाता-या भावजयीने विकलेल्या जमिनीसाठी हसन मोमीनच्या मुलांशी वैर धरताना दिसतो. आपल्या मागे आपल्या मुलानेही आपला दरारा कायम ठेवावा म्हणून तो 'बंडा' नावाच्या मुलाला खारीक खोबरे घालून पोलादासारखा तयार करतो. अशा या पोलादीसारख्या मुलाला

मोमीनच्या पाहुण्याने कुस्तीत पाडल्यावर मोमीनशी असलेले वैरत्व डोळयासमोर ठेवून तो आपल्या मुलाला ''लेका बापाला मान खाली घालायला लावलीस. मोमीनखाली पडलास. थूत तुझ्या तोंडावर.'' (पृ.३९) असे म्हणताना त्याचा रागीट स्वभाव व अहंकारी वृत्ती येते. नेहमीच गावातील लोकांशी संबोधन करणारा बाबू कोणाशी न बोलता आपला मुलगा मोमीनकडून कुस्तीत पडला या विचारात मारुतीच्या पायरीवर उघडी छाती चोळताना दिसतो. यातून त्याच्या मनाची होत असलेली तडफड दिसून येते.

अशा या बाबू म्हात-याचा गावात मोठा दरारा दिसून येतो. त्याच्या हाकेला हाक देणारी गावात पाच पंचवीस मुले आहेत. म्हणून बाबू संतापला आहे हे समजताच मोमीनची म्हातारी 'अब क्या होगा मेरी माँ?' असे म्हणताना दिसते. व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या कथात जी सोशीक दारिद्री माणसे रेखाटली आहेत, त्या बरोबरीनेच मग्रूरी, लबाडपणाचे दर्शन घडवणा-या व्यक्ती आपल्या कथातून रेखाटल्या आहेत. त्यांच्या या व्यक्तिचित्रणाविषयी सुधा जोशी म्हणतात, ''सामान्य माणसाच्या दारिद्रयाचे, शोषणाचे चित्रण जसे माडगूळकर करतात, तसेच त्या जोडीने या माणसांची वर्मे, व्यंगे किंवा मनुष्यसुलभ दोष यांच्याकडेही लक्ष व्येधल्यावाचून ते राहात नाहीत. शोषितांच्या अगतिकते प्रमाणेच त्यांच्या मग्रुरीने मुडद्राडपणाचे व लबाडीचेही दर्शन घडवितात.''[३]

बाबू म्हात-याच्या नसानसात वैरत्व भिनलेले आहे. आपल्या आईच्या सांगण्यावरून माफी मागायला गेलेल्या मोमीनच्या मुलाचे ऐकून न घेताच बाबू त्याचे चप्पलने नाक तोंड सडकतो. यातून त्याची सूडबुध्दी दिसून येते.

अशा बाबू म्हातारेचा दबादबा आणि सूडबुध्दी 'कुत्री' या कथेतही दिसून येते. परगावचा समजून रामाने मारलेला कुत्रा बाबू म्हातरेचा आहे, हे समजताच रामाची आई 'अरं, माझ्या कपाळा' (पृ. ९१) असे म्हणून बाबू म्हातरेची धास्ती घेताना दिसते. यावरून बाबू म्हातरेची दहशत दिसून येते, तर रामाने आपल्या कुऱ्याला मारले आहे, हे माहीत असूनही त्याबद्दल एक शब्दही न काढता बाबू म्हातरे रामाला विश्वासात घेऊन त्याच्या कुत्रीला जवळ करतो व एखादी गोफण फिरवावी तशी कुत्रीला फिरवून जमीनीवर आपटतो. यातून त्याची कपटनीती व सूडबुध्दी दिसून येते. या गुणामुळेच तो संपूर्ण गावात एक हिरवट डोक्याचा माणूस म्हणून ओळखला जातो.

## धोंडी लेंगरेः

कूटनीती करणारी आणि सूड बुध्दीने पेटलेली 'करणी' या कथेतील व्यक्तिरेखा म्हणजे धोंडी लेंगरे होय. अशा या धोंडीला गांजा ओढण्याचे व्यसन आहे. त्याने कोकणात जाऊन काळी विद्या वश केली आहे. त्याच्याजवळ पितंरे आहेत, या पितरांना नेहमीच काही तरी कामगिरी हवी असते. त्यांना राबवून घेण्यासाठी धोंडी मंत्र-तंत्र, पथ्यपाणी करताना दिसतो. याद्वारेच तो करणी-धरणीसारखे प्रकार करताना दिसतो.

अशा या पितरांच्या जीवावरच बंडा न्हावीसारख्या मगरूर आणि धाडसी प्रवृत्तीच्या माणसाला जेरीस आणताना दिसतो. आपल्या घरावर करणी केली हे समजताच बंडा 'तुझ्याजवळ पित्रं हायेत. ती तू माझ्या घरावर सोडलीस!' असे म्हणताच 'न्हाव्या तूला उशिरा कळलं' पन्नास रूपयांच्या कर्जापायी तू माजी हजार रुपयाची जिमीन

बळकावलीस!'(पृ.४७) असे सूडबुध्दीने धोंडी म्हणताना दिसतो. यातून त्याने काळया विद्येला वश केलेले दिसते. या काळया विद्येवर लेंगरेचा आत्मविश्वास दिसून येतो. करणीमुळे जेरीला आलेला बंडा पितरे माघारी घेण्याची विनवणी करतो पण लेंगरे पितरे खवळलेत ती ऐकणार नाहीत. हे कारण पुढे करताना दिसतो. तर बंडाने लेंगरेचा बंदोबस्त करण्यासाठी शंभर रुपये देऊन आपणलेला फौजदार लेंगरेला झाडाला बांधून फोकानी मारताच लेंगरे 'सायब, तुझ्या बंदूकीची गोळी मारलीस, तरी हया धोंडीच्या अंगाला भोक पडणार नाही, (पृ.५३) असे म्हणताना दिसतो. यातून त्याचा काळया विद्येवरील अंधविश्वास दिसून येतो.

**आबानानाः**

एक प्रतिष्ठित म्हणून ओळखली जाणारी आणि संपूर्ण गावात शब्दाला मान असलेली व्यक्तिरेखा म्हणजे आबानाना होय. आबानाना ही वारकरी संप्रदयातील वयस्कर व्यक्ती, ते वारकरी असल्यामुळे गावातील चार भक्त एकत्रित करून रामजन्म, मारुतीजन्म असले सामाजिक कार्यक्रम मोठया हौसेने करताना दिसतात. आबांचे वय जरी झाले तरी ते अजून शेतातील कामे करताना दिसतात. गावात आलेला वानर पांडू गुरवाच्या हातातील भाकरीचा तुकडा बघून ही खाली येत नाही. हे बघत असलेले आबा 'लेका, पांडया आज वार कोणता' असा प्रश्न करून, शनिवार उत्तर मिळतात मग तो 'भाकरी कशी घेणार रं तो मारुतीराया'(पृ.५६) म्हणतात व फराळाचे आणण्याचा सल्ला देतात. यावरून त्यांची भावूक वृत्ती आणि आध्यात्मिक ज्ञानही दिसून येते. पांडूच्या हातातील फराळाचे बघूनही

वानर वधेना तेव्हा नाना स्वत! हातात फराळाचे घेवून 'देवा, मी तुमचा दासनुदास आहे. माझा निवद घ्या, म्हाता-याची सत्वपरीक्षा घेऊ नका!' असे निववतात. यावरून त्याची भावूकवृत्ती आणि श्रध्दा दिसून येते. नानाच्या विनवणीला मान दऊन वानर खाली येतो व त्यांच्या हाताला चावा घेऊन जातो. गावातील लोक आबानाना आणि त्यांच्या सुनेच्या संबधाविषयी कुजबूजताना दिसतात. येथे आबांचा स्वभाव थोडा शंकेस पात्र आहे असे दिसते. गावातील मुलांनी मिळून गावात आलेल्या वानराला मूलांनी मारले ही बातमी कळताच भावूक वृत्तीच्या आबांना अतिशय दुःख होते म्हणूनच ते वानर मेल्या ठिकाणी चौथरा बांधताना दिसतात.

## पांडू गुरवः

गुरव या आडनावाला साजेशी अशी 'मारूतराया' या कथेतील व्यक्ती म्हणजे पांडू गुरव. पांडू हा श्रध्दाळू वृत्तीचा आहे. घोडे राखण्यासाठी गेलेल्या पांडूला गावात वानर आल्याची बातमी समजताच तो हातात भाकरी घेऊन पिंपळाच्या झाडाकडे येताच त्याला गावातील मूले हातात दगड घेऊन वानराला मारताना दिसताच तो 'कुंठ फेडालं रं हे पाप?'(पृ.५५) असे म्हणताना दिसतो. यावरून त्याची श्रध्दाळू वृत्ती दिसून येते. तर गावातील मुलांना पांडू रागावताच मुले त्याचे उंडग्या बायकांशी असलेले सबंध मोठमोठयाने बोलताना दिसतात. यावरून त्याचा लागट स्वभावही दिसून येतो. आपल्या हातातील फराळाचे बघूनही वानर खाली येत नाही. तेव्हा तो आपल्या आठ वर्षांच्या मूलीकडे शेंगदाणे देवून वानराला 'देवा, हे लेकरू अस्त्राप हाय. हयाच्या हातचं तरी घ्या!' असे श्रध्दापोटी म्हणताना दिसतो.

## सखाराम पांडूरंगः

परिस्थितीने खचलेली पण स्वभावाने रगेल आणि रंगेल अशी 'कलागत' या कथेतील व्यक्तिरेखा म्हणजे सखाराम पांडूरंग होय. सखाराम उंचीने पाच फूट, अंगाने किरकोळ आणि त्यात विडीचे व्यसन असल्यामुळे छातीचे खोकं झाल्यासारखा दिसतो. सखारामचे लग्नाचे वय उलटून गेली तरी आजून परिस्थितीमुळे लग्न झालेले नाही. तो जातीने ब्राम्हण असल्यामुळे परंपरेनुसार गावची वतनदारी सांभाळताना दिसतो.

अशा या सखारामचे लग्नाचे वय उलटून गेले तरी अजून लग्न झालेले नाही आणि परिस्थितीमुळे ते होणारही नाही. म्हणूनच तो एखादी बाई ठेवण्याचा विचार गावचे लोहार, सुतार यांच्या जवळ व्यक्त करताना दिसतो. यातून तो रंगेल स्वभावाचा आहे हे दिसून येते. सखारामकडे एक वर्षासाठी जोशी पण आले असता तो पूजेचे साहित्य चांगले असले तरच लोकांचे लग्न लावतो. पूजेच्या साहित्याबरोबरच लग्नातले अंतरपाटचे वस्त्रही घेऊन जातो. यातून त्याची लालची वृत्ती दिसून येते. जसा तो लालची आहे तसा तो धूर्तही आहे. बयाबाईला तो एका दिवसात शेला पाठवून देतो म्हणून चार आठ दिवस झाले तरी देत नाही. शेवटी बयाबाई येताच तो चोरटयासारखा स्वंयपाक घरात लपून बसतो आणि बयाबाई जाताच आपल्या आईला 'गेली का थेरडी'?(पृ.६३) असे म्हणताना दिसतो. यातून त्याचा धूर्त स्वभाव दिसून येतो तर एक दिवस पाळत ठेवून बया म्हातारी शेला मागताच तो 'बुटानं मारीन, थेरडे,' असे म्हणताना दिसतो यातून त्याचा मग्रूर स्वभाव दिसून येतो. बयाबाईचा मूलगा तूळशीराम सखारामला वाटेत गाठून मारताना तो त्याच्यावर हात न

उचालता तो त्याच्यावर तालूक्याला जाऊन फौजदारी गुन्हा दाखल करतो. यातून त्याचा राजकीय गुणही दिसून येतो. अशा या वृत्तीचा सखाराम गावची वतनदारी करतो.

**बुवाः**

लोकांच्या विश्वास संपादन करून विश्वासघात करणारी 'गुप्तधन' या कथेतील व्यक्तिरेखा म्हणजे बुवा होय. बुवा दिसायला निबर चेह-याचा, केस दाढी वाढवलेला, कपाळ आणि नाक यांच्या मानाने तोंड आणि हनुवटी लहान आहे. एक डोळा पिचका आणि दात थोडेसे पुढे असलेला बुवा चेह-यावरून मवाळ स्वभावाचा दिसतो.

गावात येऊन झोपलेल्या बुवाला गावकरी हालवून मोठयाने हाका मारतात, पण तो लवकर उठत नाही आणि ज्यावेळी उठतो त्यावेळी त्याला नाव, गाव विचारताच तो नाव 'उसेन' आणि जात मात्र मराठयाचा सांगतो. या दोन्ही नावात विसंगती आहे. म्हणजे तो आपली ओळख लपवताना दिसतो. यातून तो धूर्त आहे हे दिसून येते. तशी या भोंदूची वृत्ती कष्ट करून खाण्यापेक्षा भीक मागून जगण्याचीच आहे. हातापायाने चांगला असलेल्या बुवाला गावचा पाटील कष्ट करण्याचा सल्ला देतो, पण बुवा कष्ट करण्यापेक्षा गुरवाचे काम पसंत करून गावात पीठ मागून आपला उदर निर्वाह करतो. या बुवाची पीठ मागण्याची एक खास सवय म्हणजे तो दारात आवाज न करता संपूर्ण घर न्याहाळत उभा राहतो. यातून त्याला लोकांची सहानुभूती आणि आपली भोंदूगिरी साधायची आहे असे दिसते.

पाटलाच्या वाडयाला भिक्षा मागायला गेलेला बुवा बराच वेळ वाडा न्याहाळतो आणि पाटील बाहेर येताच 'मला एकान्ती भेट' म्हणून बुचकळयात टाकतो. मध्यरात्री लंगोटी लावून बसलेल्या बुवा जवळ पाटील जाताच बुवा त्याला वाडयातील गुप्तधनाची लालूच दाखवतो व या गुप्तधनाच्या बदल्यात तो उता-याच्या नावाखाली तळलेली कोंबडी, चपात्या, दारू असले चमचमीत पदार्थ घेताना दिसतो. यातून त्याची लालची वृत्ती आणि भोंदुगिरी दिसून येते. तर गुप्तधन म्हणून तो गावक-यांच्या कडील गोळा केलेल्या चिंध्या आणि मेलेला साप ठेवतो. येथे त्याचा विश्वासघातकी स्वभाव दिसून येतो.

**नाना कुलकर्णीः**

धूर्त आणि भ्रष्टाचारी म्हणून ओळखता येणारी व्यक्तिरेखा म्हणजे 'भुताचा पदर' या कथेमधील नाना कुलकर्णी होय. नाना तसा स्वभावाने बेरकी आणि डोक्याने हुशार आहे. रंगाने गाजरासारखा लाल आणि अंगाने गुबगुबीत आहे.

धूर्त नाना मिळालेल्या संधीचा फायदा उठवताना दिसतो. वतनदारी मिळवण्यापूर्वी नानाच्या घरी अठरा विश्व दारिद्रय असते. पण वतनदारी मिळताच तो गावावर दबदबा ठेवून आणि गावच्या पाटलाला हातातले बाहुले करून पाच वर्षाच्या कारकिर्दीत कडेपाट वाडा, मळे, जनावरे, मुलांची लग्ने अशी अमाप संपत्ती मिळवलेला दिसतो. पंच्च्याहत्तर रूपये पगार असलेल्या नानाने एवढी संपत्ती गोळा करणे हा गावचा विषय बनतो व देवळाच्या कट्टयात जमलेले लोक नानाने लाच खाल्ली हा विषय काढताच तो, 'मी लाच खाल्ली

पण जे मिळवल ते सगळंच लाचेचं नाही'(पृ.८०) असे म्हणताना दिसतो यातून त्याची भ्रष्टाचारी वृत्ती दिसते.

त्याने मिळवलेली संपत्ती पचवण्यासाठी तो गावातील लोकांना यात्रेतून येताना घडलेली कहाणी सांगताना तो 'माझी भानगड निराळी आहे. तुम्हाला न पटणारी आहे.' असे म्हणून लोकांच्या मनात सहानुभूती निर्माण करताना दिसतो. आपल्या संपत्तीचे रहस्य उलघडताना खरसुंडीच्या जत्रेहून परत येताना आपल्या बरोबर घोडयावर बसलेल्या भुताचा पदर कापून तो घरात पुरला व त्याच्या मार्फत आपण ही संपत्ती मिळवली अशी कहाणी तयार करताना दिसतो. त्याची कहाणी ऐकणारा गणा 'अहो आता तुमाला काय करायची आहे कुलकरण्याची न्योकरी' असे म्हणताच तो गांधीवधाच्या जाळपोळीत घराबरोबर पदरही जळाला असे सांगताना दिसतो. यातून त्याचा धूर्त स्वभाव प्रकट होतो. असा हा नाना कुलकर्णी आपणाला मिळालेल्या संधीचे सोने करताना दिसतो.

### पाटीलः

कायदयाच्या कचाटयात सापडलेली व्यक्तिरेखा म्हणजे 'विलायती कोंबडी' या कथेतील पाटील होय. पाटील हा घरातील कामांना महत्त्व न देता गावातील कारभारच बघताना दिसतो. कारण जाणा-येणारे गावकरी विलायती कोंबडयांना दाणे टाकणा-या पाटलाला बघताच अचंबित होताना दिसतात. गावकरी पाटलांच्या कोंबडया समजून विचारपूस करताच पाटील गावक-यांचे कोडे सोडवताना तो सरकारने दिलेल्या हया विलायती जातीच्या कोंबडया गावक-यांनी जतन करून गावात त्यांची संख्या इतकी वाढली पाहिजे की दुसरी

कोंबडयाची जात दिसली नाही पाहिजे हे पटवून सांगत असतानाच 'पर कोंबडयाची जात काकळ, रोगानं मेलीबिली म्हंजे मग आणि का पिडा!' (पृ.९९) हे महादूचे वाक्य ऐकताच पाटील बुचकळयात पडताना दिसतो. यावरून त्याला सरकारने दिलेल्या कोंबडयांची झालेली डोकेदु:खी दिसून येते. माळगूळकरांनी व्यक्ती बरोबरच पक्षांनाही तेवढयाच सामर्थ्यपणे आपल्या कथेतून अविष्कृत केले आहे. या विषयी वासुदेव मुलाटे म्हणतात, ''माणदेशाच्या छोटयाशा परिवारातील ग्रामीण जीवनाला आणि विशेषतः तेथील खेडुताला ते समर्थ जिवंत उभा करू शकले. नुसते माणसाला ते जिवंत करतात असे नव्हे तर तेथील प्राणी, पक्षी, निसर्ग, घर, वाडे या सगळयांचीच ते तेवढयाच सामर्थ्याने प्रतीती आणून देतात.''[४]

अचानक सरकारी दप्तरतपासणी मामलेदार गावात आला असता तो दप्तरातील चुका काढून लाहया फुटावे असे बोलताना पाटलांची भांबेरी उडलेली दिसते.

संतापालेल्या मामलेदाराकडून सुटका करून घेण्यासाठी पाटील पट्टेवाल्याच्या सूचनेनुसार मामलेदाराला मटनाचे जेवण देऊन खूष करताना दिसतो. पण रात्रीचे केलेले जेवण हे विलायती कोंबडीचे होते हे समजताच पाटील मटकन खाली बसून 'आरं, माझ्या देवा! आता तू मला फासावर चढवतीस!' (पृ.१०२) असे बायकोला म्हणताना दिसतो. यातून आधीच जेरीला आलेला पाटील आणखीन जास्तच खचलेला दिसतो. या प्रकरणातून सुटण्यासाठी तो मामलेदाराला तो 'मला माहीत नव्हत सांभाळून घ्या एकवार' असे म्हणताना दिसतो. यातून तो सरकारी कायद्यात अडकून परिस्थितीसमोर हतबल झालेला दिसतो.

## सता लेंगरेः

हाडाचं कांड आणि रक्ताचे पाणी करुन आपला उदरनिर्वाह करणारी 'न्याय' या कथेतील व्यक्तिरेखा म्हणजे सता लेंगरे होय. सताची आर्थिक परीस्थिती तशी बेताचीच आहे. एका जमिनीच्या तुकडयाच्या आधार असलेल्या सताला रात्रंदिवस कष्टकरुन त्या तुकडयावरच वर्षभर अवलंबून राहावे लागते. म्हणूनच तो शेतात रात्र दिवस राबताना दिसतो. रात्री गप्पा मारता मारता देवळाच्या कटटयावर झोपी गेलेला सता सकाळी घराकडे न जाता आपल्या शेतात पाखरे हाकायाला जातो. यातून त्याची कष्टाळू वृत्ती दिसून येते. अशा व्यक्तिरेखाविषयी रा.गो.चवरे म्हणतात, "माणदेशाच्या मातीत रुजलेली व त्यातच अंकूरलेली ही कथा जीवंत, रसरशीत अनुभवाने संपन्न आहे. ग्रामीण भावभावनेचा आशा-आकांक्षांचा, हर्षोन्मादाचा आणि वेदनेचा तीत हुंकार आहे."[५]

शेतक-याला शेतातील सात-आठ पायली ज्वारी चोरीला जाणे ही काही मोठी बाब नाही. पण सता येवढया ज्वारीसाठी हातवारे करून आपला संताप व्यक्त करताना दिसतो. यावरून त्याला संसारासाठी किती कसरत करावी लागते हे दिसून येते. पीक चोरीला गेले म्हणून संतापलेला सता बडबडत रामोशी वाडयात जाऊन 'माजं समदं पीक कुनी बैलाला चारलंय, तुम्ही काय गाजरं खात बसला का?'(पृ.१०६) असा संताप नामजी रामोशीसमोर व्यक्त करताना दिसतो. नामजी जमिनीतीलं चोरीचा छडा संध्याकाळपर्यंत लावतो. असे सांगताच सता त्याला शेतातील थोडी वैरण काढून देतो. यावरून त्याला झालेल्या आनंद दिसून येतो. नामजी पुराव्यानिशी ह-या मांगच शेतातील चोर

आहे हे सांगताच तो ह-याला पंचायत बोलवून गावक-या समोर उभा करतो व गावकरी  ह-याला पाच शेर तेलाचा दंड करतात ही शिक्षा तो मान्य करताना दिसतो.  यातून सता शेतात चोरी केलेला चोर सापडला म्हणून आनंद व्यक्त करताना दिसतो.

## नामजी नाईकः

पोलीस खात्यालाही लाजवेल अशी 'न्याय' या कथेतील गुप्तहेर व्यक्तिरेखा म्हणजे नामजी नाईक होय. नामजी हा रामोशी समाजातील असल्यामुळेच गावची रखवाली हे आपले कर्तव्य आहे हे समजूनच काम करताना दिसतो.  सता शेतात चोरी झाली म्हणून रामोशी वाडयात येवून हाका मारताच हातात भाकरी घेवून जेवत असलेला नामजी हातातील भाकरी तशीच ठेवून 'बोला, काय हूकूम हाय, असे म्हणताना दिसतो. यातून त्याची स्वामीनिष्ठा दिसून येते.

सताबरोबर संपूर्ण शेत न्याहाळणारा नामजी 'बैल न्हाईती.  बरं का.  कालवडीचं काम हाय हे, लहान खूर दिसतात न्हव?'(पृ.१०७) असे म्हणताना त्यांची तीक्ष्ण नजर बारीक बारीक गोष्टी न्याहाळताना दिसते.  संध्याकाळप्रर्यंत चोरी करणा-याचे नाव सांगतो म्हणून गेलेला नामजी दिवसभर रानं, माळं शोधून दिवस मावळतीच्या आत चोरटयाचा पत्ता लावताना दिसतो. यातून त्याचा प्रामाणिकपणा दिसून येतो.  एखादया चोराला तो पुराव्यांनिशी धरताना दिसतो.  ह-या मांगाविषयी पूरावा देताना तो ह-याच्या घरापर्यंत एक एक बाटूक गोळा करीत जातो आणि आपल्या बायकोला ह-याच्या गाचीचे शेण आणायला सांगून त्या शेणात कोवळे जोंधळे सापडल्याचा पुरावा देतो. येवढे करूनही ह-या मांग चोरी कबूल करताना दिसत नाही, तेव्हा

प्रतिष्ठा पणाला लावलेल्या नामजी ह-याला ‘परमान’ कराचला सांगून चोरी कबूल करून घेताना दिसतो.

**संदिपानः**

दारिद्रय माणसाला काहीही करायला लावते. प्रसंगी चोरी करून माणूस पोट भरतो. त्याचे उदाहरण म्हणजे माडगूळकरांची ‘बेत’ ही कथा होय. या कथेतील संदिपान आणि विठोबा हे पोटासाठी क्रूर कर्महो करायला कचरत नाहीत. संदिपान हा वयाने चाळीशी गाठलेला, दिसायला खुजा, रूंद खांदयाचा, गालाची हाडे वर आलेला, बारीक डोळयाचा आणि ओठावर पुसट मिशा असलेला आहे. त्याला नेहमी सावकाश बोलण्याची सवय आहे.

संदिपान हा चोरी करण्यात पटाईत दिसतो. एखादा कपडा, वैरण, लाकूड असा फालतू वस्तूवर त्याचा डोळा दिसतो. कधी तरी त्याची चपळाई उघडकीस आली तर ताकदीने भारी असलेला संदिपान शेतक-याच्या चार-पाच लाथा खाताना दिसतो. अशा या संदिपानला चोरी करणे आपला हक्क आहे असे वाटते. कारण विठोबा संदिपानला अमिनभाईच्या नादाला लागू नकोस. त्याला कोंबडा चोरलेले समजले तर तुला तो सोडणार नाही असे समजून सांगताच संदिपान ‘अरे चोरी करावी मर्दानं!’ (पृ.१२६) असे म्हणतो. गावात महारवाडयात रहाणारा समाज हा गावात एखादे जनावर मेले तर त्याच्यावर तुटून पडताना दिसतो. गावात बरेच दिवस जनावर मेले नाही म्हणूनच संदिपान ‘गडया काय तरी वशीट खाया होवो. जीब आळणी झालीया माझी’(पृ.१२५) असे म्हणताना दिसतो. यातून संदिपानची लालची वृत्ती दिसून येते. या लालची वृत्तीचे कारण

त्याची बायकोही आहे असे दिसते. ब-याच दिवसानी ती गरोदर राहिली आहे. तिला मटण खाण्याची इच्छा झाली आहे. म्हणून ती 'गावातल्या जित्राबास्नी बी रोगडा येईना' असे म्हणताना दिसते. निष्ठुर स्वभावाचा संदिपान गावच्या पाटलांनी आपल्या मुलासारखा सांभाळलेल्या खोंडाला मध्यरात्री जाऊन विष घालून आपल्या बायकोची इच्छा पूर्ण करण्याचा बेत करतो. निर्दयी संदिपान मेलेल्या खोंडाकडे बघून रडण्या-या पाटलांच्या मुलाबरोबर आपणही रडण्याचे ढोंग करतो आणि 'रडून ते का माघारी येतंया का जी? उठा न्हेऊ द्या आमाला आता'(पृ.१२८) असे निष्ठुरपणे म्हणताना दिसतो पण त्याचा हा बेत सफल होताना दिसत नाही.

**विठोबाः**

'गळयात माळ आणि पोटात काळ' अशी व्यक्ती म्हणजे विठोबा होय. माळकरी विठोबा वयाने चाळीस पंचेचाळीसच्या आसपास आहे. उंचीने आणि अंगाने भरीव आणि रंगाने काळा, चालताना खांदा उडवून लांब लचक ढांगा टाकतो आणि वारंवार थुंकत असतो.

अशा या विठोबाला कामाचा नेहमीच कंटाळा दिसतो. त्याची बायको गावच्या लांडी-लबाडी करून आणि काही तरी लहान मोठी कामे करून घर सांभाळताना दिसते, आणि विठोबा बायकोच्या जीवावर जगताना दिसतो. विठोबाच्या गळयात माळ आहे पण तो माळ खुंटीला टांगून मटन खाताना दिसतो. संदिपानच्या प्रश्नाला उत्तर देताना तो 'त्याला काय बाट हाय? खान्यावक्ती माळं मातृर गळयात काढून ठेवतो बरं'(पृ.१२६) असे म्हणताना दिसतो. विठोबा आपली मटन खाण्याची इच्छा पूर्ण करण्याची संदिपानला

अमिनभाईच्या कोंबडयाची चोरी करताना साथ देताना दिसतो. तर कोंबडयाने भागत नाही म्हणून गावच्या पाटलांच्या बैलाला विष घालून मारताना संदिपान बरोबर विठोबाही सहभागी होताना दिसतो. कारण तो संदिपानाला 'संध्या, पाटलाच्या पोराला वहीम आला का रं, आपला?' असे म्हणताना दिसतो.

## गोपा व्हरलः

माडगूळकरांच्या 'गावाकडच्या गोष्टी' या कथा संग्रहातील 'ऑडिट' या कथेतील एक विशेष व्यक्तिरेखा म्हणजे गोपा व्हरल होय. गोपा रंगाने काळया करवंदासाररखा, नाकाने नकटा, डोळे मिचमिचणारा आणि गालाची हाडे वरती आलेला आहे. अशा या रामाला कोणी पानाचा विडा दिला तर त्याची चव संपेपर्यंत तो तोंडात घोळत ठेवताना दिसतो. पान खाताना तहान लागली तर तो तोंडातील चोथा काढून पाणी पितो व परत चोथा तोंडात टाकतो अशी त्याला खोड आहे.

गोपा परिस्थितीने दरिद्री पण स्वभावाने ताठर आहे. आपल्या शेळीने दिलेल्या दोन बोकडाच्या जीवावर तो आपल्याच तो-यात वागताना दिसतो. इतर लोकांशी वागताना देखील तो मीपणाचा आव आणताना दिसतो. बोकड खरेदी करण्याच्या उद्‌दशाने आलेल्या गणा चालपतकडे तो न बघताच बोलतो. गणा चलपते बोकडाची किंमत विचारताच 'सांगून फायदा व्हनार न्हाई चलपते. तुमाला दाम परवडनार नाई.'(पृ.१४२) असे हिनवून बोलताना दिसतो. गावातील एक प्रतिष्ठित आणि आडदांड असलेली व्यक्ती गणा चलपते बराच वेळ येऊन उभा असूनही गोपा त्याला खाली बसण्यास सांगत नाही.

उलट गणा तीस रूपये सांगितलेल्या दामाला वीस रूपये म्हणताच गोपा बोचरे हसून 'मग रेडा कापून खा की एखादा, बोकडाची चव कशाला तुमाला?'(पृ.१४३) असे म्हणताना दिसतो. यातून त्याच्या स्वभावातील उर्मटपणा प्रकट होतो.

मगरूर स्वभावामुळे त्याचे व गणाचे तोंड लागताना दिसते. खोपटाबाहेर आलेल्या व्हरल लोकांना बघून गोपाला ताव येतो. म्हणूनच तो गणाला चळपत्याला 'इथं कोन भेनार न्हाई!' असे म्हणताना दिसतो. यातून तो परिस्थितीने नसला तर स्वभावाने उद्धट आहे. आपल्यापेक्षा मोठया व्यक्तीशी दोन हात करण्याची त्याची तयारी आहे. गावच्या पंचायतीलाही तो नीट उत्तरे देताना दिसत नाही. त्यामुळेच गावचा पाटील त्याला दम देऊन सरळ बोलण्याचा सल्ला देतो. त्याच्यावर गोपा 'वाकडं बोलण्याची परवानगी तुमालाच आमी गरिबांनी सरळच बोलले पाहिजे' असे उत्तर देताना दिसतो. हे बोलणे खोचक असले तरी यातून त्याचा स्वाभिमान दिसून येतो. यावरून सवर्णांनी दिलेली शिक्षा अत्यंत कठोर आहे. गरिबांनी आणि अस्पृश्यांनी लाचार होऊन जगावे अशी त्यांची भूमिका असते. यावरील गो. मा. पवार यांचा अभिप्राय अत्यंत महत्त्वाचा आहे. ते म्हणतात, ''अस्पृश्य व्यक्ती निपराध असली आणि सवर्ण वर्गातील व्यक्तीने अस्पृश्यावर अन्याय केलेला असला तरी गावकरी बाजू घेणार ती सवर्ण व्यक्तीचीच अशी जणू गावरहाटी असल्याचे दर्शन माडगूळकरांच्या कथातून घडते''.[६]

आता 'गावाकडच्या गोष्टी' मधील व्यक्तिरेखांच्या तोंडी आलेल्या भाषाशैलीचा विचार करू.

**भाषाशैली:**

व्यंकटेश माडगूळकरांनी आपल्या भाषाशैलीच्या आधारे मराठी साहित्यात जो ठसा उमटवला आहे. त्याचा प्रत्यय त्यांच्या 'गावाकडच्या गोष्टी' या कथासंग्राहतून येतो. या कथासंग्रहातून येणारी भाषा ही त्या त्या व्यक्तिरेखेला समर्थपणे पेलताना दिसते. ''माडगूळकरांच्या पात्रांच्या अंगी जो सहजपणा आहे तोच त्यांच्या अनुभव घेण्याच्या पध्दतीत आहे. झाडाची सावली पडावी तसे माडगूळकर लिहतात''.[७] या गंगाधर गाडगीळांच्या मतावरून माडगूळकरांच्या भाषेतील सहजता प्रत्ययास येते. या व्यक्तिरेखांच्या तोंडी येणारी भाषा त्या व्यक्तींच्या स्वभावाला प्रत्ययकारीतेने आविष्कृत करते.

'बोजा' या कथेतील नाल्या नेव-याची बायको नव-याने जमीन विकली म्हणून कपाळ आपटून घेताना नेवरा आपल्या बायकोला 'तू कपाळ फोडून मरतीस का? अगं मग मी कुटं जाऊ' असे बोलताना त्याचे बायकोवरी प्रेम व्यक्त होते तर 'नवरा न्हवंस तू. वैरी हायेस माजा'(पृ.२७) या नेवराच्या बायकोच्या बोलण्यातून द्वेष दिसून येतो. आईची व बायकोची साथ नसल्यामुळे करार पावती रद्द करताना नेवरा ''गणा, तुझ्या पाया पडतो. माजा जीव नगं घिऊस आता' असे गणाला म्हणताना करुण भाषा बोलतो तर नेवराच्या आईने त्याच्या बायकोवर हात उचल्यावर ती आपल्या सासूला 'याद धर थेरडे'(पृ.२२) असा दम देताना दिसते. या दोघा नवरा-बायकोच्या बोलण्यात विसंगती जाणवते. नवरा मवाळ आहे. तर बायको उध्दट आहे. मुंबईसारख्या शहराची हवा खाऊन आलेला गणा आपला रूबाब दाखवण्यासाठी ''नेवरा शीख हायेस काय?'' (पृ.२३) असे

इंग्रजी शब्द बोलताना दिसतो तर गणाने दिलेल्या सिगारेटला नकार देताना नेवरा 'सपक लागती, बरसानईल.' अशी माणदेशी भाषा बोलतो. अशी ही भाषिक रूपे पाहून सुधा जोशी म्हणतात "माडगूळकरांच्या कथासाहित्यातील भाषा ही प्रमाण आणि बोली अशा दोन्ही रूपात आलेली दिसेल. संवादासाठी त्यांनी बोलीचा वापर केलेला आहे. त्यातही जातीव्यवसायानुसार भिन्न भिन्न भाषारूपे आढळतील. त्यांच्या नागरच नव्हे तर ग्रामीण कथातील निवेदनाची भाषादेखील प्रमाण भाषा आहे."[८] या मताचा विचार पुढील भाषिक विचारवरून स्पष्ट होईल. 'सोन्याची माडी' या कथेतील ढोंगी वृत्तीचा सोन्या ओळखीच्या व्यक्तीला विडी ऐवजी सिगारेट देतो. समोरची व्यक्ती सिगारेटला नकार देताच तो "आरं, ओढ जोपतूर हा सोन्या साळी आहे, तोपतूर सिगारेट शिवाय ओढू नकोस"(पृ.३१) असे म्हणताना त्याच्या बोलण्यात अतिशययोक्ती दिसून येते. तर गावातील ब्राम्हाणांनी घरे बांधण्यास काढलेले बघून आपल्या पत्नीला तो 'केरे बामणानी वाडं धरलं, आपण माडी बांधू या दोन मजली! असे म्हणताना त्याच्या बोलण्यात ईर्षा प्रकट होते. कर्ज काढून माडी बांधणारा सोन्या साळी ती माडी विकून लोकांचे देणे भागवताना 'मग माडी बांधलीसच का? अशा लोकांच्या प्रश्नावर "हौसेला मोल नाही! आन् म्हणाल कुनाची? सोन्या साळयाची माडी म्हणून वळखाल न्हंवं? मग पिढयान पिढया माझं नाव राहील का न्हाय गावात?' अशा उत्तरातून त्याची चैनीची वृत्ती आणि ईर्षा प्रकट होताना दिसते.

'झोंबी' कथेतील हासन मोमीनचा पावना हा बाबू म्हातरेच्या पोराला कुस्तीत पाडल्यावर "अल्लेक! चीत हो गया, साला!' असे उद्‌गार काढताना त्याच्या बोलण्यात स्वाभाविक जोश दिसून येतो, तर

बंडयाच्या 'कुणाला साला म्हणतोय रं भडव्या?'(पृ.३८) या वाक्यातून त्याची मगरूरी दिसून येते. कुस्तीत पडलेला बंडा जाळयातल्या माशासारखा उसळया घेऊन मोमीनच्या पावन्याच्या अंगावर जाताच मोमीनचा पोरका पावन्याला 'तुम भागो यार घरको, देखते किंव?'(पृ. ३८) असे म्हणताना त्याचा भित्रेपणा जाणवतो, तर आपला मुलगा मोमीनच्या पावन्याकडून कुस्तीत पडला हे सहन न करणारा बाबू म्हात-या ''लेका बापाला मान खाली घालायला लावलीस थूत् तुझ्या तोंडावर' असे बोलताना त्याचा मगरूर स्वभाव दिसतो. 'करणी' या कथेतील आपल्या नातीचे रातोरात केस कापले म्हणून बंडाची आई 'लोक बोलत्यात, कुणी करणी केली. आता काय करायचं रे' असे आपल्या मुलाला म्हणताना तिच्या बोलण्यात काळजीचे सूर आहेत. तर बंडा आईच्या बोलण्याकडे लक्ष न देता 'पोरखेळ सगळा! आवर पसारा'(पृ.४५) या त्याच्या बोलण्यातून आईला तो धीर देताना दिसतो. आपल्या घरावर करणी केली म्हणून जाब विचारण्यास गेलेल्या बंडाला 'न्हाव्या, तुला उशिरा कळलं, पन्नास रूपयांच्या कर्जापायी तू माझी हजार रूपयाची जमिन बळकावलीस!'' (पृ.४८) या धोंडी लेंगरेच्या बोलण्यातून त्याची सूडबुध्दी दिसून येते. तर तू वेळेवर मुद्दल दिलं न्हाईस, व्याज वाढलं, जमिन गेल्यावर का बोंबलतोस' या बंडाच्या बोलण्यातून त्याची लालची वृत्ती दिसून येते. 'मारुतराया' या कथेतील लोहार दारासमोर वानर येताच आपल्या बायकोला 'थोडया शेंगा दे ग, वानर आलाय आपल्या दारात' असे म्हणताना दिसतो. या त्याच्या वाक्यातून त्याचा श्रध्दाळूपणा दिसून येतो तर 'येडं का काय? मरू दे त्यो वानर. आपलं काम बघा'(पृ.५७) या त्याच्या बायकोच्या बोलण्यातून तिचा व्यवहारिक दृष्टिकोन दिसून

येतो. शनिवार आहे म्हणून वानर पांडू गुरवाच्या हातातील भाकरी खात नसावा असे समजून आबानाना पांडू गुरवाला 'अरं फराळा बिराळाचं काय आण, गाढवा' असे म्हणताना त्याचे धार्मिक वृत्ती दिसून येते तर आबानाना चावलेल्या वानराला बघताच त्याचा मूलगा 'राया, तू फार डाळ नासली!'' असे माकडाला उद्‌दशून बोलताना त्याचा राग व्यक्त होतो.

'कलागत' या कथेतील आपल्या मुलाचे कतृत्व सांगताना 'गावचा वतनदार आहे. तो, सगळं गाव जे म्हणतं ते तू म्हण या सखारामच्या आईच्या वाक्यातून ती मुलाचे गुणगान करताना दिसते. तर 'मला हाय, ठावं त्यो वतनदार हाय. माझ्या नामूच्या लग्नात शेला घेऊन आलाय, त्यो तेवढा माघारी द्या माझा'(पृ.६१). हे बयाबाईचे वाक्य सखारामचे अवगुण दाखवताना दिसते. सखारामची तक्रार ऐकून घेताना तुळसीराम आपल्या आईला 'आई, तू रडू नकंस, मी कुरळण्याकडं बघतो, असे म्हणताना त्याच्या वाक्यात धाडस दिसत असले तरी आईविषयी प्रेम व्यक्त होते. तर बयाबाई 'बघ, माझ्या लेकरा, पण त्याआधी खंडू बामणाकडं जा, त्याच्या इचाराशिवाय काही करू नकोस' या तिच्या बोलण्यातून मुलाविषयी प्रेम व पोक्तपणा दिसून येतो. 'गुप्तधन' या कथेतील पीठ मागण्यासाठी गेलेला बुवा ब–याच वेळ घर न्याहाळत पाटलाला 'मला एकान्ती भेट' हे त्याचे वाक्य काय तरी गुपित रहस्य सांगणारे आहे. तर 'मला का बोलवलं होतं बुवा?'(पृ.७२) या पाटलांच्या वाक्यात त्याला लागलेली हुरहूर दिसून येते. 'भुताचा पदर' या कथेत चार चौघांच्या बैठकीत नानाने लाच खाण्याचा विषय निघताच नाना ''हा माझ्यावर आळ आहे. मी लाच खाल्ली. पण जे मिळवल, ते सगळंच लाचेच नाही'(पृ.८०) या

त्याच्या वाक्यातून तो खरे सांगत असला तरी त्याची भ्रष्टाचारी वृत्ती दिसून येते, तर 'तुझ्यासारखी कुलकर्णीपणाची पाळी आम्हालाही आली पण दहा तोळे सोनेच काय, पण लोखंडसुध्दा नाही सापडायच आमच्या घरात तुला' या बंडाच्या वाक्यातून त्याचा प्रामाणिकपणा दिसून येतो.

'कुत्री' या कथेत बाबू म्हातरेच्या कुत्र्याला जीवे मारल्यावर गावातील मुले 'आं? तो खवीस माणूस तुला ठावं नाही का? त्याची खोड काढतीस'(पृ.९०) या त्यांच्या वाक्यातून बाबू म्हात-याचा आडदांड स्वभाव प्रकट होतो. तर 'फसगत झाली. मी मारावा म्हणून म्हात-याचा कुत्रा मारला नाही' रामाच्या या वाक्यातून त्याचा पापभिरू स्वभाव दिसून येतो. माडगूळकरांच्या भाषेविषयी गंगाधर गाडगीळ म्हणतात, ''माडगूळकरांची एकंदर भाषाच संवेदनाप्रधान आहे. त्यांना वर्णन करीत बसावे लागत नाही. भाष्य करावे लागत नाही. भावनेचे मोजमाप करण्याकरीता त्यांना जिझलेल्या विशेषांना राबवावे लागत नाही. त्यांची संवेदनाप्रधान भाषा अनुभवच तुमच्यापुढे ऊभा करते''[१०]. बाबू म्हात-याला घाबरलेला रामा आपल्या आईला 'मी वाइसा मळयाकडनं येतो ग म्हात-याच्या' या त्याच्या बोलण्यात त्याच्या मनात चाललेली घुसमट प्रकट होते. तर 'का, रं लेकरा तिकडं काम काय!' (पृ.९०) या आईच्या वाक्यात चिंतेचे सूर दिसून येतात. 'विलायती कोंबडी' या कथेतील राणूचा महादा नवीन कोंबडया बद्दल पाटलाला विचारताना 'इलायती बेणं आणलं काय पाटील, असे म्हणताना दिसतो. या त्या बोलण्यात तो कोंबडयाची जात उच्चारण्या ऐवजी 'बेणं' ही माणदेशी शब्द उच्चारताना दिसतो. जनावरे चारायला निघालेला मुसलमानाचा मुलगा 'महादा, चार शेर मटण

पडल का या कोंबडयाचं?' या त्याच्या प्रश्नात तो किलो ऐवजी शेर म्हणताना दिसतो.

'न्याय' या कथेत सताच्या शेतात झालेल्या चोरीबद्दल 'सांजपतूर मी नाव सांगतो, कुनी कालवड चारली, ते, असे म्हणताना नामजीचा आत्मविश्वास दिसून येतो. तर 'ठीक, बघू तुझं कसब, मग पुढचं माज्याकडं लागलं' हे सताचे बोलणे प्रोत्साहन देणारे आहे.(पृ. १०७) नामजी पुराव्यासहित ह-या मांग चोर आहे. हे पटवून देताच 'मग गडया पटलं, ह-याचंच काम!' या सताच्या बोलण्यातून त्याला चोरी सापडल्याचा आनंद दिसून येतो तर चोरी धरून दिलेला नामजी 'बगा आता तुमचं तुमी, आमचं काम आमी बजावलं' असे म्हणताना त्याला जबाबदारी पार पाडल्याचा अभिमान होताना दिसतो. सताच्या रानातली चोरी करणा-या ह-या मांगाला गावकरी चोरीचा जाब विचारताच 'राती कोन जातंच रानात? इतकी लाडकी न्हाई माजी कालवड!' असे म्हणताना हरीबाची लबाडी व धूर्तपणा दिसून येतो तर 'तसा न्हाई कबूल होनार त्यो नाकाडावर जोडा द्या एक ठेवून'(पृ. ११०) या सताच्या वाक्यातून त्याचा राग व्यक्त होताना दिसतो. 'बेत' या कथेत आपल्या परिस्थितीमुळे आपली खाण्याची इच्छा पूर्ण करू न शकणारा संदिपान विठोबाला 'गडया, काय तरी वशीट खाया होवं. जीब आळणी झालीया माजी!' (पृ.१२५) असे म्हणताना दिसतो. आपल्या बायकोची व आपली मटण खाण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी पाटलाच्या खोंडाला विष घालून मारणारा संदिपान 'झाली गोष्ट होऊन गेली, रडून ते का माघारी येतंया का जी? उठा न्हेऊ द्या आमाला आता!' (पृ.१२८) असे म्हणताना त्याचा निष्ठुर स्वभाव आणि हावरट वृत्ती दिसून येते. तर 'तू हातनं जातूस का न्हाई

संद्या?' या पाटलाच्या पोराच्या वाक्यातून बैल मेल्याचे दुःख दिसून येते. 'आडिट' या कथेत गोपाच्या बोलण्याने संतापलेला चलपते 'काय रं ए भडव्या, कुनाला बोलतोस हे' असा दम देताना दिसतो, तर 'ममईला दावावी असली अक्कड! इथ कोन भेनार न्हाई'(पृ.१४३) गोपाच्या या बोलण्यातून त्याची मगरूरी व धाडस दिसून येते. गावक-यांच्या प्रश्नाला गोपा नीट उत्तर देत नाही हे लक्षात येताच गावचा पाटील 'वाकडं बोलू नकोस गोप्या!' असा दम देतो तर '-हायल, जी! वाकडं बोलण्याची परवानगी तुमालाच' गोपा असे खोचक उत्तर देताना दिसतो. एकूणच माडगूळकरांच्या भाषेविषयी गंगाधर गाडगीळांच्या भाषेत सांगायचे म्हटले तर ''माडगूळकरांनी माणदेशी बोली वापरायची म्हणून माणदेशी बोली वापरलेली नाही. त्यांनी तिचा यांत्रिकपणे उपयोग केलेला नाही, तर आपल्या कलाकृतींच्या निर्मितीला आवश्यक तेथे व तितकाच तिचा त्यांनी उपयोग केला आहे. आवश्यक तेथे शुध्द भाषा वापरायला ते कचरत नाहीत आणि प्रसंगोपात्त एखादा जड संस्कृत शब्दही इष्ट तो परिणाम साधण्याकरिता वापरतात''.[१०] तर माडगूळकरांच्या भाषेच्या स्वभाविकता व सहजता याविषयी बोलताना गो.मा.पवार म्हणतात ''त्यांच्या भाषेत एकाच वेळी स्वाभाविक सहजता व विलक्षण सामर्थ्य यांचा अढळ होताना दिसतो. भाषेच्या स्वरूपाची आणि सामर्थ्याची जाण माडगूळकरांना आहे. भाषेचा ते अत्यंत जाणीवपूर्वक उपयोग करताना दिसतात''.[११]

गंगाधर गाडगीळ आणि गो.मा.पवार यांचे माडगूळकरांच्या भाषेवरील अभिप्राय यथार्थ आहेत असे म्हणता यईल.

## समारोपः

'गावाकडच्या गोष्टी' या कथासंग्रहातील एकूणच व्यक्तिरेखांचा विचार करताना या व्यक्तिरेखांची विविध वैशिष्टये, त्या व्यक्तिरेखा कशा प्रकारे साकार करतात याचा आढावा घेतला आहे. या कथा संग्रहातील नाल्या नेवरा, गणा चलपते, सोन्या साळी, बाबू म्हातरे, नाना कुलकर्णी या व्यक्तिरेखा माणदेशातील बेरकीपणा फसवेगिरी, श्रध्दाळूपणा या स्वभावचे बारकावे आविष्कृत करतात. तर धोंडी लेंगरे, आबानाना, बजा वाणीण या व्यक्तिचित्रणातून माणदेशातील अंधश्रध्दा, रूढी, परंपरा, चालीरीती, संस्कृती यांचे दर्शन घडवितात. तर 'विलायती कोंबडी', 'मारुतराया', 'कुत्री' या कथा संग्रहातून पशुप्रिय माणसांच्या वृत्ती–प्रवृत्ती रेखाटल्या आहेत.

'गावाकडच्या गोष्टी' या कथासंग्रहातून येणारी भाषा ही त्या–त्या व्यक्तिरेखेला समर्थपणे पेलताना दिसतो. या व्यक्तिरेखांच्या तोंडी येणारी भाषा या व्यक्तींच्या स्वभावाला प्रत्ययकारीकतेने आविष्कृत करते. तसेच ही भाषा माणदेशी बोलीला वेगवेगळया अंगाने तिच्यातील बारकाव्यासहित चित्रित करते.

# संदर्भ


१) जोशी सुधा : <u>'कथाः संकल्पना आणि समीक्षा'</u> मौज प्रकाशनगृह, मुंबई. प-आ-२००० पृ-क्रं-१०८)

२) गाडगीळ गंगाधर : <u>'खडक आणि पाणी'</u> उत्कर्ष प्रकाशन, पुणे. तृ-आ-१९८५ पृ-क्रं-२६६

३) जोशी सुधा : <u>'कथाः संकल्पना आणि समीक्षा'</u> पूर्वोक्त पृ-क्रं-९९

४) मुलाटे वासुदेव : <u>'ग्रामीण कथाः स्वरूप आणि विकास'</u> स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. द्वी-आ-२००५ पृ-क्रं-२४

५) चवरे रा.गो. : <u>'मराठी कथा प्रवृत्ती आणि प्रवाह'</u> मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती. प्र-आ-१९९५ पृ-क्रं-६४

६) पवार गो.मा.(संपा.): <u>'ओझं'</u> साकेत प्रकाशन, औरंगाबाद. प्र-आ-१९८७, पृ-क्रं-१०

७) गाडगीळ गंगाधर : 'खडक आणि पाणी'
'पूर्वोक्त' पृ-क्रं-२७०

८) जोशी सुधा : 'कथाः संकल्पना आणि समीक्षा'
'पूर्वोक्त' पृ-क्रं-११६

९) गाडगीळ गंगाधर : 'खडक आणि पाणी'
'पूर्वोक्त' पृ-क्रं-२७७

१०) गाडगीळ गंगाधर : 'तत्रैव' पृ.-क्रं-२७६

११) पवार गो.मा. 'ओझं'
'पूर्वोक्त' पृ-क्रं-३२
प्रथम आवृत्ती मे २०००
पृष्ठ क्र. ५७